दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १११
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.०३ डिसेंबर २०२४




## लाडकी बहीण योजनेचे २१०० रुपये कधी मिळणार?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, मुंबई :** आमचं सरकार आल्यानंतर लाडकी बहीण योजनेचे पैसे आम्ही नोव्हेंबरमध्येच डिसेंबरचे पैसे देऊ असं आश्वासन तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं होतं. तसंच, जाहीरनाम्यात वचन दिल्याप्रमाणे पात्र महिलांना दीड हजार रुपये न देता २१०० रुपये देऊ असं आश्वासनही एकनाथ शिंदे यांनी दिलं होतं. परंतु, आता स्पष्ट बहुमत असतानाही सरकार स्थापन झालेलं नाही. एकनाथ शिंदे आता काळजीवाहू मुख्यमंत्री आहेत. नोव्हेंबर महिनाही सरला आहे, मात्र पात्र महिलांच्या खात्यात लाडकी योजनेचे पैसे जमा झालेले नाहीत. दरम्यान, भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या विधानामुळे राज्यभर वेगळीच चर्चा रंगली आहे. या विधानावर आता सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. ते एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते.



**इंडियन एक्स्प्रेसच्या मुलाखतीत सुधीर मुनगंटीवार काय म्हणाले होते?**

या मुलाखतीवेळी मुनगंटीवार यांना प्रश्न विचारण्यात आला की निवडणुकीच्या जाहीरनाम्यात महायुतीने आश्वासन दिलं होतं की लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांना दिल्या जाणाऱ्या रकमेत वाढ करू. महिलांना १,५०० रुपयांऐवजी २,१०० रुपये देण्याचं आश्वासन तुम्ही दिलं होतं. ते आश्वासन पूर्ण कराल का? कारण राष्ट्रवादीने (अजित पवार) म्हटलंय की हे केवळ एकनाथ शिंदे यांचं आश्वासन होतं. यावर सुधीर मुनगंटीवार म्हणाले, आम्ही १०० टक्के ते आश्वासन पूर्ण करू. महिलांना दिली जाणारी रक्कम १,५०० रुपयांवरून २,१०० रुपये अशी वाढवली नाही तर देशभरात आमची प्रतिमा खराब होईल. निवडणुका जिंकल्यानंतर आश्वासन पूर्ण न करणारे अशी आमची प्रतिमा देशभर पसरवली जाईल. मी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणार आहे की आपण आपल्या शब्दांवर ठाम राहायला हवं. महायुतीचा जाहीरनामा समितीचा अध्यक्ष या नात्याने मी आमच्या जाहीरनाम्यातून, संकल्प पत्रातून दिलेली आश्वासनं धुळीस मिळू देणार नाही. आमच्या सरकारमध्ये प्रत्येक पात्र महिलेला २,१०० रुपये देण्याची क्षमता आहे. मला वाटत नाही की आमचा कोणताही मित्रपक्ष याला विरोध करेल. वाढीव रक्कम कधीपासून दिली जाणार? जानेवारी की जुलै, कोणत्या महिन्यापासून ही वाढीव रक्कम द्यायची यावर चर्चा केली जाईल. आम्ही गेल्या वर्षी रक्षाबंधनादिवशी दिवशी ही योजना लागू केली होती. त्यामुळे आम्ही पुढील वर्षी भाऊबीजेपासून ती रक्कम वाढवू शकतो.

**सुधीर मुनगंटीवरांनी काय स्पष्टीकरण दिलं?**

मला प्रश्न विचारला की योजना कधी सुरू होणार? मी म्हटलं की हा निर्णय मंत्रिमंडळात घेतला जाईल. अर्थसंकल्पात त्याचा निधी दिला जाईल. भाऊबीज फार लांब होईल. रक्षाबंधनाला ही योजना सुरू झाली. त्यामुळे तेव्हापासून वाढीव रक्कम द्यायची की एक एप्रिलपासून द्यायची हे मंत्रिमंडळात ठरवलं जाईल, हे मी मांडलं, असं सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

## कल्याण ग्रामीणमध्ये मतमोजणीत संशयकल्लोळ

### मतांच्या फेरमोजणीसाठी अर्ज दाखल !

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि. ०२, कल्याण( ठाणे) :** विधानसभा निवडणुकीचे निकाल लागून काही दिवस उलटले असतील तरी या निकालाची चर्चा अजूनही देशभरात सुरू आहे. काही ठिकाणी धक्कादायक निकाल लागल्याने ईव्हीएम मशीनच्या यंत्रे व सोशल मीडियासह इतर व्यासपीठावरही अनेक प्रश्न उपस्थित केले जाऊ लागलेत... डोंबिवली विधानसभेत ठाकरे गटाचे पराभूत उमेदवार दीपेश म्हात्रे यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे पुन्हा मतमोजणीसाठी अर्ज केल्याची माहिती ताजी असताना कल्याण ग्रामीणमध्ये ही मनसेचे राजू पाटील आणि ठाकरे गटाचे सुभाष भोईर या दोघांनी ठाणे जिल्हा अधिकाऱ्याकडे या मतदारसंघाच्या मतमोजणीची पुन्हा मागणी केली आहे.

कल्याण ग्रामीण ची लढाई प्रतिष्ठेची मानली जात होती...या लढाईत खरा सामना पाटील विरुद्ध भोईर असाच होणार असे राजकीय कयास बांधले गेले. मात्र शिंदेच्या शिवसेनेचे राजेश मोरे या ठिकाणाहून विजयी झाले आणि सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. मोरे हे चांगल्या मताधिकार्यांनी निवडून आल्याने त्यांचा



विजय संपूर्ण राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला. या मतदारसंघात काटे की टक्कर होणार असे अंदाज खोटे ठरले आणि बक्कळ लीड घेऊन राजेश मोरे आमदार झाले.

विश्वासनीय सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार निकालानंतर दोन माजी आमदार एकमेकांच्या संपर्कात आले. ज्या परिसरात संबंधित आमदारांचे वर्चस्व होते त्या ठिकाणीही दोघे आमदार पिछाडीवर होते तर शिंदेच्या शिवसेनेचे उमेदवार आघाडीवर होते....हे कसे काय शक्य आहे? अशी चर्चा दोन्ही आमदारांमध्ये झाली. त्यानंतर मनसेच्या राजू पाटील यांनी २२ तर सुभाष भोईर आणि ५ यंत्रे व्हीव्हीपॅट यंत्रातील मते पुन्हा मोजण्यासाठी अर्ज केला आहे. या वर्तुळाला ठाकरे गट आणि मनसेकडून कडून दुजोरा देण्यात आला असून मतमोजणीसाठी लागणारी रक्कम देखील भरण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. व्हीव्हीपॅट यंत्रातील मते मोजण्यासाठी ठिकाण आणि तारीख निश्चित केली जाईल अशी दोन्ही पक्षाकडून सांगण्यात आलं.

राजकारणामध्ये विजय पराभव या गोष्टी सुरूच असतात मात्र मतमोजणी मध्ये शंभर टक्के गोंधळ झाला असून. पुन्हा मोजणी केल्यावर काय माहिती समोर येईल. ही माहिती नाही पण कल्याण ग्रामीण मधील नागरिकांमध्ये ही या निकाल विषयी उलट सुलट चर्चा सुरू आहे. असे या दोन्ही पक्षातील पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले त्यामुळे निवडणूक निकालानंतर एकत्र येणार हे माजी आमदार कल्याण ग्रामीण मधील राजकीय गणित जुळवण्यासाठी एकत्र येतात का? असाही सवाल या निमित्ताने उपस्थित करण्यात येत आहे. तर दुसरीकडे फेरमतमोजणीनंतर व्हीव्हीपॅट मशीन मधून काय बाहेर येईल याकडे मतदार संघातील मतदारसंघ राजकीय पक्षांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या नजरा लागल्या आहेत.

## 'समृद्धी'वर अपघातांसह गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, बुलडाणा :** अपघात बरोबरच गुन्हेगारी घटनांसाठी अधून मधून गाजत असलेल्या समृद्धी महाम ार्गावर संभाव्य दरोडा टळला आहे. याचे कारण पोलिसांनी दरोड्याचा तयारीत असलेल्या टोळीतील दोघांना अटक केली आहे. त्यांच्या जवळून दरोड्याचे साहित्य, चारचाकी वाहन आणि शस्त्रे जप्त केली आहे.

लोणार तालुक्यातील बीबी पोलिसांनी दरोडेखोरांचा सिने स्टाईल पाठलाग करून जालना जिल्हा हद्दीमधून त्यांना जेरबंद केले. मात्र, दोघे जण अंधाराचा फायदा घेत पसार होण्यात सफल ठरले आहे. समृद्धी द्रुतगती म हामार्गावर काल रात्री हा थरार घडला. बिबी पोलीस ठाणे हद्दीत समृद्धी महामार्गावर रात्री १ वाजताच्या सुमारास चैनल नंबर ३०६ जवळ ही घटना घडली. यावेळी बीबी पोलीस ठाण्याच्या 'पेट्रोलिंग' चमुला उभ्या असलेल्या ट्रक समोर कार (क्रमांक एमएच ०१ बिजी ८९६६ महींद्रा एक्स युव्ही) थांबून त्यातील चार लोक रस्त्यावरील उभे असल्याचे दिसून आले. यावेळी अंधाराचा फायदा घेत दोघांनी पळ काढला.पोलिसांचे वाहन दिसताच दोघांनी वाहनाने पळ काढला. संशय बळवल्याने बीबी पोलिसांनी त्यांचा पाठलाग केला. बीबी पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करत जालना हद्दीतून दोन आरोपीना ताब्यात घेतले. या दोन आरोपींकडून महिंद्रा एक्सयुव्ही५०० कारसह दोन धारदार चाकु, रॉड, दोरखंड, गुंगीचे स्प्रे व



इतर दरोडा टाकण्याकरीता बाळगलेले साहीत्य असा ७ लाख ५० हजार ८५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. वेगाने पळ काढणाऱ्या वाहनाने बुलढाणा जिल्हा हद्द ओलांडून जालना जिल्हा सीमेत प्रवेश केला. मात्र, बीबी पोलिसांच्या पथकाने त्यांचा पाठलाग सुरूच ठेवून अंबड रोड जालना येथे वाहन पकडले. दरम्यान कार क्रमांक एमएच ०१ बिजी ८९६६ सह दोन आरोपी ताब्यात घेतले आहे. यावेळी आरोपींची कसून चौकशी केली असता वाहनात दोन धारदार चाकू, रॉड, लोखंडी पाईप, मिरची पूड, दोरखंड, स्प्रे व इतर वस्तू दरोडा टाकण्याकरिता बाळगलेले साहित्य मिळून आले. आरोपींनी ते साथीदारांसह समृद्धी महामार्गावर उभ्या राहत असलेल्या वाहनावर दरोडा टाकून लूटमार करण्याचे उद्देशाने आले होते. मात्र पोलीस आल्याने पळ काढण्याची कबुली दिली व इतर फरार साथीदार आरोपींची नावे देखील सांगितली. यावरून बीबी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता नुसार कलम ३१०(४) सह कलम ४,२५ शस्त्र अधिनियम अन्वये दरोड्याची पूर्वतयारी बाबतचा गुन्हा नोंद केला. अभिषेक उर्फ रावण प्रताप गवारे (वय २२ वर्षे राहणार साडेसावंगी,तालुका अंबड, जिल्हा जालना व रंगनाथ बाजीराव डबडे (वय २५ वर्षे राहणार चांभारवाडा, तालुका अंबड जिल्हा जालना) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.या दोघांना अटक केली असून न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे. या घटनेतील इतर आरोपींचा बीबी पोलिसांकडून युद्धपातळीवर शोध सुरू आहे.

**अट्टल गुन्हेगार !**

बीबी पोलीस ठाण्याच्या पथकाने केलेल्या सतर्क पेट्रोलिंग मुळे व जालनापर्यंत पाठलाग करून आरोपींना पकडल्याने मोठी घटना होण्यापासून टळली आहे. गुन्ह्यात समाविष्ट असलेले सर्व आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांचेवर यापूर्वी देखील जबरी चोरी डिझेल चोरी, स्टेपनी चोरी यासारखे बरेच गुन्हे दाखल आहे. पुढील पोलीस तपासात अधिक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर कामगिरी पोलीस उपाधीक्षक विश्व पानसरे, अप्पर पोलीस अधीक्षक बी.बी.महामुनी, अशोक थोरात, मेहकरचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली बिबी पोलीस ठाण्याचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील, पोलिस अंमलदार परमेश्वर शिंदे, अरुण सानप, रवी बोरे यांनी केली आहे.

## एकाच दिवशी १०० शस्त्रक्रिया यशस्वी !

### जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या नेतृत्वाखाली आयोजन

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.२ ठाणे :** 'माता आणि बाल' यांचा सर्वांगीण आरोग्याचा हे सार्वजनिक आरोग्य विभागाचे केंद्रबिंदु असून या ध्येयाला स्म रून ठाणे जिल्ह्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांच्या प्रेरणेतून विठ्ठल सायण्णा सामान्य रुग्णालय ठाणे येथे 'राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम' अंतर्गत एकाच दिवशी शंभर लहानग्यांवर विविध शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्या.

मानवी शरीर हे एका वृक्षासारखे असते. जसे त्याचे वय वाढत जाते, तसे ते थोडे कमकुवत होत जाते. अश्यात ते बाल्यअवस्थेत असतांनाच त्याची निगा राखणे आवश्यक आहे. हा विचार करून ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वतीने राष्ट्रीय बालस्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत एकाच दिवशी शंभर मुलांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यासाठी आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर आणि उपसंचालक डॉ. अशोक नांदापूरकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमा अंतर्गत ० ते १८ वयोगटातील मुला मुलींच्या हर्निया, डोळे, रक्ताची गाठ, चिकटलेली बोट, फायमोसिस, मान पोटाची गाठ अशा तब्बल १०० शस्त्रक्रिया एकाच दिवशी करण्यात आल्या. शस्त्रक्रिया एकाच दिवसात करायची असल्यामुळे दोन दिवस अगोदरच मुलांना घेऊन त्यांचे पालक सिव्हील रुग्णालयात दाखल झाले होते. त्यामुळे त्यांच्या खाण्या पिण्याची आणि राहण्याची संपूर्ण सोय रुग्णालयाने उत्तम केली होती. के ई एम हॉस्पिटलचे माजी अधिष्ठाता डॉ.संजय ओक यांच्या मार्गदर्शनाखाली ह्या शस्त्रक्रिया पार पडल्या. यासाठी सायन रुग्णालयाच्या टीम ने विठ्ठल सायण्णा सामान्य रुग्णालयाच्या टीम बरोबर समन्वय साधून हे शिवधनुष्य पेलले. अति. जिल्हाशल्यचिकित्सक डॉ धीरज महंगाडे, निवासी वैद्यकीय अधिकारी (ब.स) डॉ मृणाली राहूड, अधिसेविका श्रीम प्रतिभा बर्डे, विनोद जोशी, रोशन पाटील यांनी सर्व पालकांचे उत्तम मार्गदर्शन केले व संपूर्ण शिबिर सुरळीत पार पडेल याकडे जातीने लक्ष देऊन उत्तम नियोजन केले.

## जव्हार मधील रानवाडी परिसरात बिबट्याचा वावर !

### नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन...

**अक्षराज : प्रमोद मौळे**




**दि.०२, जव्हार (पालघर) :** जव्हार वनपरिक्षेत्र-दक्षिण जव्हार विभागाकडून परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या भागात बिबट्या या वन्यप्राण्याचा वावर आढळून आल्याने नागरिकांनी अधिक सावध राहणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच लहान मुलांची व रात्रीच्या वेळी नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे. वन विभागाने त्या परिसरातील कुटूंब, नागरिकांना सूचना देण्यात आल्या. यामध्ये मुलांच्या सुरक्षिततेची काळजी घ्या, मुलांना शाळेत पालकांसोबत किंवा गटागटाने पाठवा. रात्री गटाने फिरा, काठी, बॅटरी सोबत ठेवा आणि रात्री बाहेर पडताना आवाज करा, पाळीव प्राण्यांची काळजी घ्या, शेळ्या-मेंढ्या, कोंबड्या व गाई-म्हशी बंदिस्त गोठ्यात ठेवा. घराबाहेर जाणे टाळा, रात्रीच्या वेळी किंवा अंधारात घराबाहेर पडणे शक्यतो टाळावे. आवाज करून सतर्क राहा, बाहेर जाताना गाणी लावणे, बोलत राहणे यामुळे बिबट्याचा धोका कमी होतो. गस्त घालण्याचे नियोजन करा, गावातील नागरिकांनी पहाटे व सायंकाळी गटागटाने गस्त घालावी, अशा सूचना वन विभागाकडून देण्यात आल्या आहे.

बिबट्या दिसल्यास काय कराल? वन विभागाकडून सूचना, सगळे बिबट्ये धोकेदायक नसतात, घाबरून न जाता सतर्क रहा. डबे वाजवून किंवा मोठ्याने ओरडून बिबट्याला पळवण्याचा प्रयत्न करा. त्याला दगड मारू नका किंवा पाठलाग करू नका; यामुळे तो अधिक आक्रमक होऊ शकतो. त्वरीत वन विभागाशी संपर्क साधा. बिबट्या हा अनुसूची-१ मधील संरक्षित प्राणी असून त्याला इजा करणे किंवा शिकार करणे हा भारतीय वन्य प्राणी (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत गुन्हा आहे. तसेच वन्य प्राण्यांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची काळजी घेण्यासाठी त्वरीत वन विभागाशी संपर्क साधा असा सूचना करण्यात आली आहे. नागरिकांनी वन विभागाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे आणि आपली तसेच आपल्या कुटुंबीयांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. असा सूचना देण्यात आल्या आहेत.

## ढगाळ वातावरणामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.०२, झरी (यवतमाळ) :** राज्यासह तालुक्यात दोन दिवसांपासून ढगाळी वातावरणाचा फटका शेतकऱ्यांच्या शेती पिकांना बसत आहे. तालुक्यात कापूस तुर पिकांवर ढगाळी, वादळी वातावरणाचा नुकसानकारक परिणाम होत आहे. सध्या जेमतेम फुलाने बहरलेल्या कापूस तुरी पिकांवर ढगाळी वातावरणाचा परिणाम होत फटका बसून नुकसान होत आहे. तुरी पिकांवरील बहरलेल्या फुलांना गळती लागली असून अळीचा प्रादुर्भाव वाढला त्यामुळे तुरीच्या उत्पादनात घट येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. ढगाळ वातावरणामुळे तुरी सह कापूस उत्पादक शेतकऱ्यांनाही मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागत आहे. काही शेतकऱ्यांनी पहिल्या कापसाची मजूरांच्या तुटवड्यामुळे उशिरा वेचणी केली बरे पण ढगाळ वातावरणामुळे कपाशीवरील फुलांवर अळीचा प्रादुर्भाव जोर करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या फवारणीच्या खर्चात वाढ झाली आहे. यंदा सोयाबीन उत्पादकांना सोयाबीनचे उत्पादन घटल्याने फारसा लाभ झाला नाही. कापूस व तूर हरभरा पिके संकटमोचक ठरतील अशा आशयाच्या विचारात येथील शेतकरी असतांना व ऐन हिवाळ्यात तुरी फुलाने बहरल्या असताना व कापूस वेचणीच्या वेळी वादळी वातावरणात बदल झाल्याने नुकसान होत आहे. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी वर्गाच्या चिंतेत वाढ झाल्याचे चित्र आहे.




## अजरामर कवियत्री

मराठी साहित्यातील अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचा आज ३ डिसेंबर रोजी ७३ वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उदगारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी - अहिराणी - खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर - माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण - उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा ( मियते ) मिळते भाकर......, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला......, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...... धरित्रीले दंडवत..... यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभिने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांचा ७३ वा स्मृतिदिन आहे. स्मृतिदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

# बांगलादेशातील हिंदूंवरील हल्ले थांबणार तरी केव्हा ?

५ ऑगस्टला बांगलादेशात शेख हसीना यांचे सरकार पडल्यानंतर तेथे मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला. दंगली झाल्या, प्रचंड प्रमाणात जाळपोळ झाली. शेख हसीना यांनाही देश सोडून भारतात पलायन करावे लागले. सुरुवातीला आपापसांतील वाटणारा हा वाद हळूहळू तेथील हिंदूंच्या दिशेने वळला. स्थानिक हिंदूंना जाणीवपूर्वक लक्ष केले जाऊ लागले, हिंदूंना घरात घुसून मारहाण होऊ लागली, त्यांची घरे, दुकाने लुटून ती जाळण्यात येऊ लागली, त्यांच्या जमिनी हडपण्यात आल्या, त्यांना त्यांच्याच घरातून हाकलले जाऊ लागले. हिंदूंच्या मंदिरांवर हल्ले होऊ लागले, देवतांच्या मूर्तींची तोडफोड होऊ लागली, हिंदू स्त्रियांवर, बालकांवर अत्याचार होऊ लागले. ऑगस्ट महिन्यात देशभरात पसरलेले हे हिंदुविरोधी लोण आजही कायम आहे. नव्या सरकारचे या दंगेखोरांना अभय असल्याने मागील चार महिन्यात हिंदूंवरील हल्ले काही थांबलेले नाहीत.

बांगलादेशाचा ८० टक्के भाग हा पूरग्रस्त आहे त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात या ठिकाणी पूर येतो. यंदा आलेला पूर हा अत्यंत भीषण होता, ज्यामध्ये ५० लाखाहून अधिक नागरिकांचे स्थलांतर करावे लागले होते. नागरिकांच्या खाण्यापिण्याचे हाल झाले होते अशा प्रतिकूल परिस्थितीत देशातील अनेक हिंदू संघटनांनी पूरग्रस्तांना मदत करण्याचे काम केले. त्यांतील एक इस्कॉन या हिंदूंच्या संघटनेने पूरग्रस्तांना प्रतिदिन मोठ्या प्रमाणात अन्नदान करण्याचे कार्य केले. अन्नदान करताना पूरग्रस्त हे मुसलमान आहेत कि हिंदू आहेत हे न पाहता निस्वार्थ भावनेने त्यांनी अन्नदानाची मोहीम देशभर राबवली. कोरोना काळात जेव्हा साऱ्या जगभरातील दळणवळण थांबले होते तेव्हाही बांगलादेशातील इस्कॉन संघटनेने तेथील नागरिकांना अन्न पुरवण्याचे काम केले. धार्मिक भेदभाव न ठेवता मानवतावादी दृष्टिकोनातून सातत्याने लोकांच्या साहाय्यासाठी धावणाऱ्या इस्कॉनवर बांगलादेशात आज मात्र धार्मिक कट्टरतावादी संघटना असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. इस्कॉनचे स्वामी चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांना अटक करून त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला भरण्यात आला आहे. इस्कॉनने देशवासीयांवर केलेल्या उपकाराची जाण न ठेवता ती केवळ एक हिंदू संघटना आहे म्हणून तिच्यावर बंदी घालण्यास निघालेलया बांगलादेशला आणि तेथील स्थानिक नागरिकांना संकटकाळात मदत करून इस्कॉनने काही चूक केली का ? असा सवाल आज भारतभरात विचारला जात आहे.



स्वामी चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांच्या अटकेमुळे भारतातील हिंदू संघटना आक्रमक झाल्या असून त्यांच्या सुटकेसाठी आणि बांगलादेशातील हिंदूंवरील हल्ले थांबवून त्यांच्या सुरक्षेसाठी भारत सरकारने लवकरात लवकर ठोस पावले उचलावीत अशी मागणी आंदोलने, निवेदने, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स यांवरून केली जात आहे.

१९४७ सालच्या अखंड भारताच्या फाळणीमध्ये पूर्व आणि पश्चिम अशा दोन भागात पाकिस्तानची निर्मिती झाली. त्यातला पूर्व भाग हा आजचा बांगलादेश म्हणून ओळखला जातो. तत्कालीन पूर्व पाकिस्तानाची भाषा बंगाली, तर पश्चिम पाकिस्तानात उर्दू भाषेचा वापर होत होता. भाषा आणि इतर काही प्रश्नामुळे पूर्व पाकिस्तानातील जनतेचा असंतोष वाढत गेला. हा असंतोष मोडून काढण्यासाठी पाकिस्तान सरकारने लष्कर पाठविले आणि तेथे लष्करी कायदा लागू केला. ज्यामुळे बांगलादेशमध्ये हाहाकार पसरला, अखेर भारताने यामध्ये हस्तक्षेप पूर्व पाकिस्तानातील नागरिकांना संरक्षण दिले आणि १९७१ मध्ये बांगलादेश या स्वतंत्र देशाची निर्मिती केली. आज हे सारे उपकार बांगलादेश विसरला आहे. १९४७ साली पूर्व पाकिस्तानमध्ये म्हणजे आताच्या बांगलादेशमध्ये एक तृतीयांश हिंदू होते. २०२२ मध्ये जेव्हा देशात जनगणना झाली तेव्हा तेथे ७.९६ टक्के हिंदू शिल्लक राहिल्याची अधिकृत आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. फाळणीनंतर तेथील हिंदूंची संख्या कमी होत गेली तर मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत गेली. फाळणीपासूनच स्थानिक अल्पसंख्य हिंदूंना लक्ष केले जात आहे, स्थानिकांच्या छळाला कंटाळून दरवर्षी लाखो हिंदू देशातून पलायन करतात. हे प्रमाण गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढले आहे. बांगलादेशातील हिंदूंना दिली जाणारी अन्याय्य वागणूक हा जुना विषय असला तरी गेल्या चार महिन्यांत तेथील हिंदूंची स्थिती अत्यंत बिकट झाली आहे, हे असेच चालत राहिले तर पुढील काही महिन्यांतच बांगलादेशात नावालाही हिंदू शिल्लक राहणार नाही. याउपरांत बांगलादेशातील गरिबीला कंटाळून बांगलादेशी मुसलमानांचे लोंढेच्या लोंढे भारतात येत आहेत. आजमितीला ही संख्या १० कोटीहून अधिक झाली आहे भारतातील विकसनशील शहरी भागात बांगलादेशी नागरिकांच्या वस्त्या तयार झाल्या आहेत. येथील स्थानिक झोपडपट्टी दादा पैशांच्या मोबदल्यात या बांगलादेशी घुसखोरांच्या निवाऱ्याची, नोकरी व्यवसायाची आणि कागदपत्रांची व्यवस्था करून देतात. आजमितीला अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये आणि अनधिकृत कामांमध्ये बांगलादेशी घुसखोरांचा सहभाग असल्याचे सिद्ध झाले आहे.घुसखोरांना त्यांच्या देशात हाकलण्याचा कायदाही अस्तित्वात आहे; मात्र त्याची कठोरपणे अंमलबजावणीच केली जात नाही. एकीकडे बांगलादेशातील हिंदू नामशेष होऊ लागला आहे तर दुसरीकडे भारतात आलेले बांगलादेशी घुसखोर भारताची अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आणू लागले आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांत आणि त्याआधी झालेल्या लोकसभा निवडणुकांत देशातील हिंदूंनी मोठ्या प्रमाणात मतदान करून हिंदुत्ववादी विचारांचे सरकार केंद्रात बसवले आहे. देशभरातील हिंदू आता जागृत होऊ लागला आहे आणि बांगलादेशात होणाऱ्या हिंदूंवरील अत्याचाराविरोधात भारताने ठोस भूमिका घेण्याची मागणी करू लागला आहे, त्याच सोबत भारतात राहणाऱ्या बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना त्यांच्या देशात हाकलण्यासाठी आग्रही झाला आहे. आज जसे बांगलादेशात हिंदूंना लक्ष केले जात आहे तसे ज्यू लोकांना लक्ष करण्याची हिम्मत कोणत्याही देशाची नाही. ज्यू लोकांवर जगभरात कोठेही हल्ले झाले तर इस्त्रायल पेटून उठतो, ज्यू लोकांना संरक्षण देण्यासाठी आक्रमक होतो. येणाऱ्या काळात केंद्र सरकार बांगलादेशातील हिंदूंना संरक्षण देण्याच्या बाबतीत काय पावले उचलते हे पाहणे आता महत्वाचे ठरणार आहे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

# कळंब तालुक्यातील नविन रेशनकार्ड धारकांना धान्य उपलब्ध करण्याची मागणी

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०२, कळंब :** कळंब तालुक्यातील नविन रेशनकार्ड धारकांना धान्य मिळत नसल्याने तात्काळ धान्य उपलब्ध करण्याची मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, कळंब तालुक्यातील अनेक नागरीकांनी नविन शिधापत्रिका काढल्या आहेत परंतु सदरील शिधापत्रिका धारकांना अद्यापही धान्य मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होऊ लागली आहे. तसेच अनेक कुटुंबातील काही व्यक्तींची नावे रेशनकार्ड मध्ये ऑनलाईन नसल्याने महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या योजना ही घेता येत



नसल्याने अडचणी निर्माण होत आहेत त्यामुळे रेशनकार्ड धारकांना त्यांच्या हक्काच्या लाभांपासून वंचित राहवे लागते. त्यामुळे अशा नागरीकांसाठी गावस्तरावर विशेष कॅम्पचे आयोजन करून त्यांची नावे ऑनलाईन करावीत, तसेच रेशन धान्य दुकानातून धान्य उचलल्यास रेशन कार्डधारकांना त्याची पावती देण्यात यावी.

अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. मागण्या मंजूर न केल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा ईशारा देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे, कामगार आघाडी चे तालुकाध्यक्ष लक्ष्मण बनसोडे, शहर अध्यक्ष तुकाराम ताटे, सचिव रामभाऊ आव्हाड, संघटक संतोष सोनवणे, सुशील गायकवाड, सुरज कांबळे, किरण सावंत, शिवहरी शिंदे, या वेळी उपस्थित होते.

## जाता गावा..

रान का पेटून उठले
नेते गण जाता गावा
वाटत असे त्यांनाही
घरच्यांना वेळ द्यावा

मातीचा गंध खुणावे
आवडे वावराची हवा
सकारात्मक कधीतर
रे सुयोग्य विचार हवा

कुणीएकांतात बसून
फुकरघालतात घावा
होतअसतील सुशांत
अंमळ समय रे द्यावा

जरा थकल्या जीवा
आठवणी मस्तरमवा
माणूस आहो शेवटी
मित्रांनासंगती जमवा

अंतर्मुख होत असती
बोध खरोखरी घ्यावा
आपला जरा खाजगी
वेळ प्रत्येकांला द्यावा

संशयी वृत्ती विषारी
सदैव का घेता चावा
शोध अंतर्मना घ्यावा
चेहरा कसा वाचावा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# भारतीय नौदल दिन

**भारतीय नौदलातर्फे दरवर्षी ४ डिसेंबर हा दिवस भारतीय नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्याआधीचा पूर्ण सप्ताह हा देशभरात नौदल सप्ताह म्हणून साजरा केला जातो. ४ डिसेंबर याच दिवशी नौदलदिन का साजरा केला जातो हे जाणून घेऊया.**

१९७१ सालच्या सुरवातीपासूनच भारत आणि पाकिस्तानमध्ये कमालीचा तणाव निर्माण झाला होता. तत्कालीन पूर्व पाकिस्तान मधून पाकिस्तानी हवाईदल सातत्याने भारतीय हद्दीत घुसखोरी करत होते. भारताने अनेकदा इशारे देऊनही पाकिस्तान आपली खोड मोडायला तयार नव्हते. १९७१ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारासच युद्ध पुकारण्यासदृश परिस्थिती निर्माण झाली होती. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या पार्श्वभूमीवर सैन्य दलांच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली या बैठकीला मंत्रिमंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. लष्करप्रमुख सॅम माणेकशॉ यांनी या बैठकीत स्पष्ट सांगितले की सध्याची परिस्थिती आणि ऋतू हे आपल्यासाठी अनुकूल नसल्याने सध्यस्थितीत युद्ध आपल्याला परवडणारे नाही.

युद्धासाठी नोव्हेंबर पर्यंत थांबावे लागेल. नोव्हेंबर पर्यंत सैन्याची जुळवाजुळव व्यवस्थित करता येईल याची खात्री देण्यासही ते विसरले नाही. खरंतर एप्रिलमध्येच युद्ध व्हावे या मताच्या इंदिरा गांधी होत्या पण लष्करप्रमुखांनी परिस्थिती विषद केल्यानंतर नोव्हेंबर पर्यंत थांबण्याचा निर्णय पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाने घेतला. त्यामुळे आपण काहीही केले तरी भारत आपल्याला उलट उत्तर देऊ शकणार नाही अशा आविर्भावात पाकिस्तान वावरू लागला. त्यांनी ३ डिसेंबर




रोजी भारतीय सीमाभागावर पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानातून जोरदार हल्ले चढवले. त्याचवेळी भारतीय विमानवाहक युद्धनौका आयएनएस विक्रांतला सागरतळात बुडवण्याची योजना पाकिस्तानने आखली. पाकिस्तानची ही योजना भारतीय नौदलाच्या लक्षात आल्याने भारतीय नौदलाने चुकीचा संदेश पाठवून पीएनएस गाझी ची दिशाभूल केली आणि डाव साधला.

भारतीय नौदलाने चढवलेल्या हल्ल्यात गाझी या पाकिस्तानच्या पाणबुडीला जलसमाधी मिळाली. भारताच्या आयएनएस विक्रांतला सागर तळाशी पाठवण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानी नौदलाची सर्वात शक्तिशाली असलेली गाझी ही पाणबुडीच सागर तळाशी पोहचल्याने पाकिस्तानला मोठा धक्का बसला. गाझी पाणबुडीला जलसमाधी मिळाल्यानंतर बंगालच्या उपसागरात आयएनएस विक्रांतने आपला दरारा पसरवला आणि पाकिस्तानी नौदलाचे कंबरडे मोडून काढले. आयएनएस विक्रांतवरील धावपट्टीचा वापर करत नौदलाच्या लढाऊ विमानांनी हल्ला चढवून पूर्वेकडे पाकिस्तानला डोकेही वर काढू दिले नाही. हे सुरू असतानाच पश्चिमी मुख्यालयाच्या नौदल ताफ्याने धाडसी नियोजन करुन लहान आकाराच्या नौकांच्या मदतीने छुप्या पद्धतीने पाकिस्तानी सागरी हद्दीत प्रवेश करत थेट कराची बंदरावरच हल्ला चढवला. पाकिस्तानी युद्धनौका, पाणबुड्या त्यांच्यावरील या अचानक झालेल्या हल्ल्याने हादरुन गेल्या. कराची बंदरावर थेट हल्ला होऊ शकतो, याची कल्पनाच पाकिस्तानी नौदलाने केली नव्हती. ३ व ४ डिसेंबरच्या मध्यरात्री भारतीय नौदलाने केलेल्या या हल्ल्याने पाकिस्तानचे कंबरडे मोडले आणि युद्धाचे पारडे भारताच्या बाजूने झुकले. त्यानंतर दहा दिवसांतच पाकिस्तानने शरणागती पत्करली. नौदलाच्या या पराक्रमाची आठवण म्हणून ४ डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानंतर भारतीय नौदलाचा जगभरात दबदबा निर्माण झाला.

अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि दक्षिण महासागरात भारतीय नौदलाचे सामर्थ्य निर्माण झाले. आज भारतीय नौदल हे जगातील सर्वाधिक शक्तिशाली नौदल म्हणून ओळखले जाते. आज भारताचे नौदल हे जगातील पाचव्या क्रमांकाचे नौदल आहे. भारतीय नौदलाकडे एकूण ५५ युद्धनौका आणि ५८ हजार ३५० सैनिक आहेत. भारताकडे ९ विध्वंसक, १५ नौका, न्यूक्लिअर हल्ला करणारी एक पाणबुडी, १४ पारंपरिक पाणबुडीसह आधुनिक शस्त्रे आहेत म्हणूनच जगातील सर्वात शक्तिशाली नौदलामध्ये भारतीय नौदलाची गणना होते. भारतीय नौदलाला नौदल दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# विंचूरचे ग्रामदैवत खंडोबा महाराज चंपाषष्ठीनिमित्त भव्य यात्रा उत्सवास सुरुवात

## ९ दिवसीय भव्य चंपाषष्टी, १२ गाड्या उत्सवास सुरुवात

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२, विंचूर (नाशिक) :** मार्गशीर्ष महिन्यातल्या पहिल्या दिवसापासून मल्हारी षडरात्रोत्सव घरोघरी सुरू होतो. जसा देवीचा नवरात्रोत्सव तसाच हा श्री खंडेराव महाराजांचा षडरात्रोत्सव. मार्गशीर्ष प्रतिपदा ते षष्ठी पर्यंत हा उत्सव दरवर्षी साजरा करतात. पण जेजुरी प्रमाणेच महाराष्ट्राच्या अन्य अनेक गावांमध्ये हा चंपाषष्ठीचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्याची परंपरा आहे.

त्यापैकीच एक विंचूर हे गाव. विंचूर येथील चंपाषष्ठी उत्सवाची परंपरा फार पूर्वीपासून चालत आली असुन, आजही ही परंपरा गोविंद भुजंगे, किसन बाबा भुजंगे यांच्या आशीर्वादाने व प्रेरणेने आणि मानकरी सदाशिव किसन भुजंगे, बाबू दादा दरेकर, मधु दरेकर, बाबाजी क्षिरसागर, उद्धव गोरे यांच्या मार्गदर्शना खाली हा उत्सव आनंदात सुरू आहे. या चंपाषष्ठी उत्सवाची सुरुवात दि.२९ नोव्हेंबर ते दि.७ डिसेंबर पर्यंत असणार आहे. अशा या नऊ दिवसात भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन मल्हारी मंडळ व विंचूर ग्रामस्थांकडून केले जाते. या भव्य खंडेराव महाराज यात्रा व बारागाड्या उत्सव काळात सायं. ७:३० वा.भव्य महाआरती केली जाते, तसेच बहादुरी, एकरुखे, कोपरगाव, हिंगणवेडे, गुळवंच, विसापूर, कुंदेवाडी, पाचोरे खुर्द, लखमापूर या गावाचे वाघे मंडळाचे जागरण गोंधळ कार्यक्रम होत असून तर चंपाषष्ठी शेवटच्या दिवशी सकाळी ८:३० वा. काकडा- आरती, ९:३० वा. मांडव डहाळी, १०:०० वा.कावडी, दुपारी २ वा. भव्य मिरवणूक पूर्ण गावातुन सह वाद्ये, वाघे मंडळ गाणे



म्हणत, खंडोबा महाराजांची पालखी सजवत, भंडाऱ्याची उधळण करत, भक्तगण संबळ्याचा ठेक्याचा ताल धरत अशा आनंदमय वातावरणात भव्य फेरी मिरवणूक काढण्यात येते, नंतर सायं. ६ वा. बारा गाड्या ओढल्या जाणार असून, या वेळेचे बारा गाड्या ओढण्याचे मानकरी मच्छिंद्र किसन खांदोडे हे आहे. या चंपाषष्ठी यात्रा उत्सव निमित्त श्री खंडेबाच्या दर्शनाला पंचक्रोशीतून तर दूर दूर गावांवरून भाविक दर्शनासाठी येथे येत असतात. या भव्य यात्रेमध्ये अनेक प्रकारची दुकाने या कालावधीत थाटली जातात. ज्यात विविध प्रकारची मिठाई मध्ये जिलेबीची दुकाने हे विशेष आकर्षण असते.

तर त्याच प्रमाणे बाळगोपाळांसाठी खाऊची दुकाने, खेळणीची दुकाने, रहाट पाळणे, झुले अशी एक प्रकारची मेजवानीच आहे. या काळात मंदिरात, मंदिरावर, आकर्षक विद्युत रोषणाई ने सजवून गाभारा सुद्धा फुलांनी सजवला. मंदिरा समोर दिपमाळ असुन ती या काळात दिव्यांनी सुशोभित करतात. या भव्य खंडेराव महाराज यात्रा उत्सवाचे आयोजन जय मल्हार मंडळ व समस्त विंचूर ग्रामस्थ व सुभाष नगर, विष्णुनगर, हनुमान नगर, कृष्ण वाडी, विठ्ठलवाडी व आदी भाविक.

# थोडक्यात

## जिल्ह्यातील ४० टक्के विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.०२, (लातूर) :** शासन मान्यताप्राप्त अनुदानित, विनानुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवर मुदतीत भरणे आवशक आहे. आतापर्यत ६० टक्के विद्यार्थ्यांनी अर्ज भरले असून आणखी ४० टक्के विद्यार्थ्यांचे प्रस्ताव महाडीबीटी पोर्टलवर भरलेले नाहीत. त्यांना शिष्ववृत्ती न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जवाबदारी संबधित महाविद्यालय व विद्यार्थ्यांची राहील. असे सामाजिक न्याय विभागाकडून सूचित करण्यात आले आहे. गतवर्षी १२ हजार ९६९ विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्ववृत्ती मिळाली होती. यावर्षी आतापर्यत ६ हजार ८१३ विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरलेले आहेत आणखीन ४० टक्के विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल केले नाहीत. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप अर्ज दाखल केले नाहीत. त्यांनी तात्काळ महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज सादर करावेत असे आव्हान समाज कल्याणचे सहायक आयुक्त एस.एन चिकुर्ती यांनी केले आहे. अर्धे शैक्षणिक वर्ष संपत आले असताना शिष्ववृत्ती अर्ज प्रलंबित राहू नयेत असे ही सूचित केले आहे.

## उंबरखिंडच्या ऐतिहासिक लढाईचा ३६३ वर्षाचा इतिहास !

**अक्षराज : मानसी कांबळे**



**दि.०२, खालापूर :** खालापुर येथील छावणी येथे असलेल्या उंबरखिंड येथील लढाईचा इतिहास जाणून घेण्यासाठी हजारों पर्यटक, शाळेतील विद्यार्थी यांच्या क्षेत्रभेट या ठिकाणी होतात. येथील इतिहास म्हणजेच हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वतः एकूण २७ महत्वपूर्ण लढायांमध्ये भाग होता. त्यातील उंबरखिंड ही महत्वपूर्ण लढाई आहे. समरभुमी उंबरखिंड इतिहास हा ३६३ वर्षापूर्वीचा आहे. सन ०२ फेब्रुवारी १६६१ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांनी कारतकब खान, रायतबागन खान याच्यासह तीस हजार फौजेचा उंबरखिंड या ठिकाणी पराभव केला. औरंगजेब ने कोकण किनारपट्टी काबीज करण्यासाठी आंबेनळी उंबरखिंड मार्गे उतरणार हे महाराजांना समजताच त्यांनी स्वराज्य सरसेनापती नेताजी पालकरांना पुढे जावून छावणी टाकण्यास सांगितले. सैन्य उंबरखिंडीचा मार्गात दबा धरून बसले होते. खानाचे सैन्य उंबरखिंडीत उतरताच एका बाजुने नेताजी पालकर आणि दुसऱ्या बाजुने स्वतः छत्रपती शिवाजी महाराज यांनी कोंडीत पकडून अचानक झालेल्या हल्ल्यामुळे खानाच्या सैन्याची दाणादाण उडाली. या लढाईचे वैशिष्ट्य होते की, कमी सैन्याने प्रचंड शत्रुंचा गनिमी काव्याने पराभव केला होता. ०२ फेब्रुवारी २०२५ रोजी या घटनेला ३६३ वर्ष पूर्ण होत आहेत.

# तुर्भे येथील रखडलेला उड्डाणपूल बनलाय मृत्यूचा सापळा

## मनसे विभाग अध्यक्ष मंजुळकर यांचे आमरण उपोषण; गजानन काळे यांची उपोषण स्थळी भेट

**अक्षराज : गणेश भवार**

**दि.०२, नवी मुंबई :** तुर्भे येथे बांधण्यात येणारा उड्डाणपुलाचे काम प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे रखडले आहे. या रखडलेल्या उड्डाणपुलाच्या कामामुळे मागील काही महिन्यांत चार पादचाऱ्यांचे नाहक बळी गेले.

तुर्भे येथील नागरिकांना याचा प्रचंड त्रास होत आहे. या घटनेचा निषेध म्हणून मनसे विभाग अध्यक्ष चंद्रकांत मंजुळकर हे आमरण उपोषणाला बसले




आहेत. आज या उपोषण स्थळी मनसे शहर अध्यक्ष गजानन काळे यांनी भेट दिली. त्यांनी या विषयाचे गांभीर्य जाणून घेतले. महानगरपालिका शहर अभियंता यांना तात्काळ संपर्क करून उड्डाणपुलाचे काम जलदगतीने व्हावे, काम पूर्ण होई पर्यंत तात्पुरता पादचारी पूल बांधण्यात यावा. तुर्भे येथे कायम स्वरूपी रुग्णवाहिका असावी अशी मागणी केली.

या मागण्या तात्काळ पूर्ण नाही झाल्या तर मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना घेवून पालिका आयुक्त यांच्या केबिन बाहेर आंदोलन करू असा इशारा दिला. पालिका अभियंते या बाबतीत बैठक घेवून तोडगा काढणार आहेत. असा विश्वास पालिका अभियंत्यांनी गजानन काळे यांना दिला.

# श्री खंडोबा यात्रा दिड महीन्यावर; रस्ताकाम अजूनही रखडले

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०२, धाराशिव :** नळदुर्ग येथील श्री खंडोबा यात्रा दिड महीन्यावर येवून ठेपली आहे, मात्र राष्ट्रीय महामार्ग ते श्री खंडोबा मंदीरा पर्यंतच्या रस्त्याचे काम दिड महीन्यात होणार की नाही यात शंका आहे, कारण होणाऱ्या कामाचा वेग पाहता यात्रे पूर्वी हे काम होणे आवघड आहे, त्यामुळे येणाऱ्या दिड महीन्या भाविकांना येण्या जाण्यासाठी रस्त्याची रुंदीकरण तरी लवकरात लवकर करावे.

अशी मागणी आता भाविकांतून होत आहे. ३ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्रातील लाखो घराण्याचे कुलदैवत असणारे नळदुर्गच्या श्री खंडोबाचे आगमन आणदुर येथून नळदुर्ग (मैलारपूर) येथे होणार आहे. दरम्यान या ठिकाणी सुमारे पावणे २ महीने श्री खंडोबाचे वास्तव्य आसणार आहे. या कालावधीमध्ये दररोज हजारो भक्त श्री खंडोबाचे दर्शन घेण्यासाठी येतात. तर दर रविवारी सुमारे लाखावर भाविक या




ठिकाणी दर्शनासाठी गर्दी करत असतात. तीर्थक्षेत्राला जाण्या - येण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग ते श्री खंडोबा मंदीर पर्यंत आमदार राणा जागजितसिंह पाटील यांनी ८ कोटी रुपयेचा रस्ता मंजूर केला आहे. या रस्त्याचे काम सध्या चालू आहे. या रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होत आहे. तर हे काम कृष्णाई कंट्रक्शन कंपनी करीत आहे. सध्या हे काम चालू असून रस्त्याची रुंदी वाढविण्याचे काम सुरु आहे.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी नाली बांधकाम होत आहे. मात्र सध्या गेल्या दिड महिन्यापासून या रस्त्याच्या एका बाजूच्या नालीचे काम सुरु आहे. परंतु होत असलेले काम एकदम संथ गतीने होत आहे. आणखीन एका बाजूची नाली बांधकाम होणे बाकी आहे. सध्या होत असलेल्या नाली बांधकाम आणखीन १५ दिवसाचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे रस्त्याचे रुंदीकरण करुन हा रस्ता संपूर्ण कांक्रीटीकरण करणे. यासाठी बराच कालावधी जाण्याची शक्यता आहे. शहरातील सुमारे ७८ कोटी रुपयेचे काम संबधीत कंपनीकडून होत आहेत, आणि या कामासाठी त्यांना सुमारे दीड ते २ वर्षाचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम ही येणाऱ्या दीड महीन्यात या रस्त्याचे काम पूर्ण होणार की नाही यात शंका आहे. येणाऱ्या दीड महीन्यात म्हणजे दि. १२, १३ व १४ जानेवारी २०२५ या कालावधी पौष पौर्णिमेच्या दिवशी या ठिकाणी श्री खंडोबाची यात्रा भरणार आहे. या यात्रेला सुमारे ६ ते ७ लाख भाविक येत आसतात. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेशातून या यात्रेसाठी भाविक येतात. महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश सीमा वर्ती भागातील चलमुर्ती म्हणून समजली जाणारी ही यात्रा आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी याचा विचार करुन येणाऱ्या दीड महीन्यात राष्ट्रीय महामार्ग ते श्री खंडोबा मंदीरा पर्यंतच्या रस्त्याच्या रुंदीकरणाचे व रस्ता बांधकामाचे काम तात्काळ करुन घ्यावे. अशी मागणी भाविकांतून होत आहे.

## गायीच्या धडकेत तरुण शेतकरी मृत्युमुखी

**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.०१, नांदगाव (नाशिक) :** तालुक्यातील कासारी येथे राहणार विनोद मोतीराम चव्हाण. वय वर्ष ४२ हे यांना गाईंना चारा टाकण्यासाठी गेले असता गोठ्यातील एका गाईने धडक दिल्याने गंभीररित्या जखमी झाले. त्यांना तात्काळ संभाजीनगर येथे खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. नांदगाव पोलिसात सदर घटनेचे आकस्मित मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.

## आमदार दौलत दरोडा यांनी केले विकास कामांचे भूमिपूजन

**अक्षराज : सुनिल फर्डे**



**दि.०२, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील सावरोली बु.गावात शहापूर विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार दौलतजी दरोडा यांच्या शुभहस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. सावरोली बु.गावातील शहापूरकडे येणारा मुख्य रस्ता, समर्थ बैठक सभागृह रस्ता आदी विकासकामांचे भूमिपूजन यावेळी आमदार महोदयांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

यावेळी भाऊ दरोडा यांचा सुद्धा ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात आले. या प्रसंगी गावातील जेष्ठ ग्रामस्थ, माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामविकास अधिकारी शिक्षक वृंद तसेच गावातील जेष्ठ नागरिक बंधु भगिनी, पत्रकार उपस्थित होते. सदरील कामे मंजूर केल्याने सावरोली बु ग्रामस्थांच्या वतीने आमदार साहेबांचे यथोचित स्वागत करून आभार मानले.

# सामाजिक प्रगती व समाजहीतासाठी समाज एकसंघ राहणे गरजेचे - ॲड.विवेक मोरे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, नागोठणे (रायगड) :** रायगड जिल्ह्यातील नाभिक समाज बांधवांच्या जिल्ह्यात असलेल्या दोन वेगवेगळ्या संघटना एकत्रीकरणासाठी बुधवार दि.२७ नोव्हेंबर रोजी मोरे फार्म हाऊस येथे रायगड जिल्हा नाभिक तरुण मंडळाचे संस्थापक कै दिनाभाई मोरे यांचे सुपुत्र ॲड.विवेक मोरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी समाजाची प्रगती व समाजहीतासाठी जिल्हा एकसंघ राहणे गरजेचे असल्याचे मोरे यांनी सांगितले.यावेळी रायगड जिल्हा नाभिक तरुण संघ अध्यक्ष सुदाम शिंदे तसेच रायगड जिल्हा नाभिक संघाचे अध्यक्ष दिनेश मोरे यांच्यासह दोन्ही संघाचे विश्वस्त,पदाधिकारी - सदस्य व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झालेल्या या सभेत सभेचे अध्यक्ष विवेक मोरे यांनी जिल्ह्यात आपला समाज कमी प्रमाणात आहे त्यामध्ये जर आपण वेगवेगळ्या संघटना काढून समाज कार्य करीत असलात तरी समाजाची प्रगती व हितासाठी सर्वांनी एकत्र राहणे गरजेचे आहे. आपले आपआपसात असलेले समज गैरसमज दूर करून जिल्हा एकसंघ राहणे आवश्यक असल्याचे सांगून सर्वांनी एकत्रीत येऊन समाजकार्य करण्याचे आवाहन मोरे यांनी केले. त्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत उपस्थित सर्वच समाज बांधवांनी दोन्ही संघ एकत्र होण्याबाबत महत्वाची भूमिका बजावली.

त्यामध्ये दिनेश मोरे यांनी जिल्ह्यात असलेल्या दोन्ही अध्यक्ष व त्यांची कमिटी बरखास्त करावी. आमचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने कमिटी बरखास्त असून तरुण संघाचे अध्यक्ष सुदाम शिंदे यांनीही आपला राजीनामा सभेचे अध्यक्ष विवेक मोरे यांच्याकडे द्यावा; व एकत्रीकरणानंतर



पुढील पाच वर्षासाठी सुधाम शिंदे अध्यक्ष राहतील व ते सर्व समाजाच्या सहमतीने कार्यकारणी निवडतील अशी महत्वाची भूमिका मांडली. त्याला उपस्थितांनी दाद दिली. सुदाम शिंदे यांनी मी अनेक वर्षे राज्य व जिल्ह्याच्या विविध पदावर राहून समाज कार्य केल्याचे सांगितले. मयूर दिवेकर यांनी विखुरलेला समाज एकत्र होणे काळाची गरज असून कुणीही कोणतेही मतभेद मनात न ठेवता सर्वांच्या एकत्रीत होऊन समाज कार्य करण्यासाठी सुदाम शिंदे व दिनेश मोरे यांनी दोन गट झालेले तालुके असलेले तंटे मिटवून एकत्र करावे.

तसेच नवीन जिल्हा कार्यकारणीची व इतर पदाधिकारी यांची पुनर्बांधणी करण्याबाबत लवकरच जनरल सभा घेण्यात येणार असून त्या ठिकाणी सर्वानुमते रायगड जिल्हा नाभिक तरुण संघाचे पुढील ५ वर्षासाठी सुदाम शिंदे यांना अध्यक्ष म्हणून मान्यता देण्यात येणार असल्याचे दिवेकर यांनी सांगितले. सर्वांनी चर्चा करून एकत्रीकरण झालेल्या सर्व समाज बांधवांनी आनंदाने सहभोजन करून सभेची सांगता करण्यात आली.

## भारतीय दलित ऐक्य समितीच्या बैठकीत विविध पदाधिकार्यांची निवड

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि. ०२, धाराशिव :** भारतीय दलित ऐक्य समितीची बैठक रविवार, ०१ डिसेंबर रोजी धाराशिव येथे घेण्यात आली. बैठकीत समितीच्या विविध पदाधिकार्यांची निवड घोषित करण्यात आली. तसेच शासनाने भूमिहीन कुटुंबांना गायरान जमीन देण्याच्या मागणीवर चर्चा करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी शंकर मुळे तर प्रमुख पाहुणे म्हणून जीवन वनवे, राजाभाऊ शिंदे तसेच महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.रमेश बनसोडे, कॉ.जनार्दन वाळवे, श्रीमंत वाघमारे, राधाताई शिंगाडे यांच्यासह इतर पदाधिकार्यांची प्रमुख उपस्थिती होती. यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी समितीच्या महिला जिल्हा कार्याध्यक्षपदी माधुरीताई क्षीरसागर, महिला जिल्हा उपाध्यक्षपदी आरतीताई नलावडे, कळंब तालुका कार्याध्यक्षपदी मयुर मस्के यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. निवडीनंतर नूतन पदाधिकार्यांचा सत्कार करण्यात आला. बैठकीत भूमिहीन कुटुंबांना सरसकट जातविरहित गायरान जमीन मिळावी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच याबाबत खा.शरद पवार, आ.राणाजगजितसिंह पाटील, आ.कैलास पाटील यांना विधान भवनात पाठपुरावा करण्याबाबतचे निवेदन देण्यात आले असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. बैठकीस समितीचे पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.